# जिल्हा प्रशासनाने मारले पण प्रसारमाध्यमांनी शेतकऱ्यांना तारले

## पवनचक्की कंपनीने नुकसान भरपाई सहित शेतकऱ्यांना मावेजा दिला

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील बालाघाटावरील मुळुकवाडी गावातील शेतकऱ्यांने शेतकऱ्यांच्या सहमती विना कोणताही मोबदला न देताच शेत जमिनीतुन रिन्यु ग्रीन एम.एच.पी.वन.प्रायव्हेट लिमिटेड नवी दिल्ली कंपनीने आमच्या शेत जमिनीतुन माझ्या कुटुंबाच्या सहमतीशिवाय पवनचक्की प्रकल्प उभारणीसाठी पोकलेन, जेसीबी,जीप,



पीक अप अशा विविध वाहनांची नियमबाह्य वाहतूक करत शेजजमीनीचे नुकसान करत असल्याची लेखी तक्रार रोहित सुरेश ढास यांनी जिल्हाधिकारी व पोलिस अधिक्षक बीड यांना दिली होती. मात्र जिल्हा प्रशासनाकडुन नेहमीप्रमाणेच दुर्लक्ष करण्यात आले. याविषयी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांनी प्रसारमाध्यमांच्या माध्यमातून आवाज उठवल्यानंतर पवनचक्की कंपनी ताळ्यावर आली आणि ज्वारी व गहु पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसानभरपाई व साहित्य वाहतूक करणाऱ्या गाड्या अनुषंगाने शेतकऱ्यांना मावेजा देण्यात आला यामुळे एकंदरीतच जिल्हा प्रशासनाने मारले परंतु प्रसारमाध्यमांनी तारले अशी भावना शेतकऱ्यांनी डॉ. गणेश ढवळे यांच्याशी बोलून दाखवत प्रसारमाध्यमांचे आभार मानले.

## सोमेश्वर मंदिर येथे अखंड हरिनाम सप्ताह मोठ्या उत्साहात येत्या २० जानेवारीला होणार सुरुवात

### सर्व भाविक भक्तांनी या सप्ताहाचा लाभ घ्यावा

**बीड । प्रतिनिधी**



बीड शहरातील सर्वांच्या नवसाला पावणारे व सर्वांचे इच्छित मनोहर पूर्ण करणारे असे भगवान श्री सोमेश्वर मंदिर या ठिकाणी गेल्या २१ वर्षापासून चालत आलेला हा अखंड हरिनाम सप्ताह या वर्षी या सप्ताहाचे २२ वे वर्षं आहे या २२ व्या वर्षी देखील मोठ्या उत्साहामध्ये आणि आनंदाच्या वातावरणामध्ये श्रीक्षेत्र सोमेश्वर मंदिर बार्शी रोड बीड या ठिकाणी मोठ्या उत्साहात साधू संतांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये येत्या २० जानेवारीला म्हणजेच येत्या गुरुवारी श्री भगवान सोमेश्वराचे पूजन करून या ठिकाणी श्री मंगल कलश स्थापना वेदमंत्राच्या जय घोषात होणार असून ब्रह्म वृद्धांच्या पवित्र वेद मंत्राच्या जय घोषणाम ध्ये या अखंड हरिनाम सप्ताहाची मोठ्या उत्साहात सुरुवात होणार आहे तरी या सप्ताहामध्ये अनेक महाराष्ट्रातील नामांकित कीर्तनकार आपली कीर्तन सेवा देणार असून या कार्यक्रमांमध्ये प्रवचन कार देखील आपली सेवा करणार आहेत. महाप्रसादाने मोठ्या उत्साहात या अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता होणार आहे तरी पंचक्रोशीतील सर्व भाविक भक्तांनी व बीड शहरातील सर्व भाविक भक्तांनी या सात दिवसाच्या चालणाऱ्या अखंड हरिनाम सप्ताहामध्ये होणाऱ्या सर्व धार्मिक कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन देव देश आणि धर्म या साठी सातत्याने लोकांच्या सेवेमध्ये आपली सेवा देणारे असे भारतीय जनता पार्टीचे नेते तथा बीड जिल्हा भारतीय जनता पार्टीचे उपाध्यक्ष तथा बीड नगरपरिषद चे सभापती मा श्री नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी तसेच त्यांचे सर्व सहकारी पत्रकार व सर्व मित्र आप्तेष्ट यांनी या सात दिवस चालणाऱ्या श्री सोमेश्वर मंदिर येथील अखंड हरिनाम सप्ताहाच्या कार्यक्रमासाठी सर्वांनी भाविक भक्तांनी उपस्थित राहून सर्व धार्मिक कार्यक्रम श्रवण करून आपला उद्धार करून घ्यावा आणि या कार्यक्रमाचा अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन केले आहे.

## पेन्शन अदालत व कार्यशाळेचे आयोजन

**बीड । प्रतिनिधी**

सर्व कार्यालय प्रमुख/ आहरण व संवितरण अधिकारी यांना सुचित करण्यात येते की, दि.२१.०२.२०२५ रोजी सकाळी ठीक ११.०० वाजता समाज कल्याण कार्यालय आवारातील आंबेडकर भवन येथे पेन्शन अदालत व कार्यशाळेचे आयोजन करण्यात आलेले आहे. म हालेखापाल नागपूर व कोषागार कार्यालय बीड यांच्या वतीने निवृत्तीवेतन धारकांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी पेन्शन अदालत आयोजित केलेली आहे. तरी जिल्हा कोषागार अधिकारी बीड यांच्या वतीने जिल्हयातील सर्व कार्यालय प्रमुख/आहरण व संवितरण अधिकारी व संबंधित लिपीक व निवृत्तीवेतन धारक यांना विनंती करण्यात येते की, आपण आपल्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी आवश्यक अभिलेखे घेवून वरील स्थळी उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हा कोषागार अधिकारी यांना केले आहे.

## डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजना

**बीड । प्रतिनिधी**

अल्पसंख्याक विकास विभागाच्या शासन निर्णय दि.११-१०-२०१३ अन्वये राज्यातील मदरशांच्या आधुनिकीकरणासाठी पायाभुत सुविधा निर्माण करणे, ग्रंथालयासाठी अनुदान, शिक्षकांचे मानधन इत्यादी लाभ देण्यासाठी सदर योजना सन २०१३-१४ पासुन राबविण्यात येत आहे. सदर योजना सन २०२४-२५ या वर्षात राबविण्याबाबत अल्पसंख्याक विकास विभाग, परिपत्रक अविवि-२०२४/प्र.क्र.६७/का.६, दिनांक-१३.०२.२०२५ अन्वये नव्याने प्रस्ताव सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

त्याअनुषंगाने इच्छुक मदरशांनी या डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजना, शासन निर्णय क्र. अविवि-२०२४/प्र.क्र.१५२/१०/ का. ६, दिनांक ११.१०.०१३ च्या शासन निर्णयासोबत दिलेल्या विहीत नमुन्यात परिपूर्ण प्रस्ताव जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती, बीड या कार्यालयात दिनांक १५ फेब्रुवारी ते २२ फ ेब्रुवारी २०२५ दुपारी ५.०० वाजे पर्यंत सादर करण्याबाबत दिनांक-१३.०२.२०२५ च्या शासन परिपत्रकात सादर करण्याबाबत सुचित केले आहे. प्रस्तावात पेयजलाची सोय करणे. (वॉटर प्युरीफायर ची सोय),इन्व्हर्टरची सोय करणे या सोयी-सुविधांची मागणी असणे गरजेचे असल्याबाबत नमुद केले आहे. विहीत मुदतीनंतर प्राप्त प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

## आष्टी न्यायालयाचा निकाल रद्द करून दोन आरोपींना प्रमुख जिल्हा व सत्र न्यायालयाने शिक्षा सुनावली

**बीड । प्रतिनिधी**

मांडवा तालुका आष्टी येथील महादेव उमाजी लगड याने दिनांक ७/२/ २००९ रोजी आष्टी पोलीस स्टेशनला आरोपी नामे महेश लगड ,रामहरी लगड, भगवान श्रीखंडे, भाऊसाहेब लगड, परमेश्वर मुटकुळे व पारूबाई लगड सर्व राहणार मांडवा तालुका आष्टी जिल्हा बीड यांच्याविरुद्ध तक्रार दिली की, दिनांक ६/२/२००९ फिर्यादी हा त्याच्या घरासमोरील पटांगणात बसला होता, त्यावेळी आरोपी महेश हा काडीची पेटी पेटून फेकत होता, फिर्यादी हा त्याला असे करू नको असे म्हणाला असता त्या ठिकाणी बाकीचे आरोपी आले व त्यांनी फिर्यादी व त्याचा मुलगा प्रल्हाद यास काठी, कुऱ्हाड व गजाने मारहाण केली. सदर मारहाणीत फिर्यादीचा हात मोडला व प्रल्हाद यांच्या डोक्याला सुद्धा मारहाण



केली. त्यावेळी आरोपींनी फिर्यादी व साक्षीदारास जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या. सदर फिर्यादीवरून आष्टी पोलीस स्टेशनला वरील आरोपी विरुद्ध कलम १४७, १४८, १४९, ३२५,३२४,३२३, ५०४ भा. द. वि.प्रमाणे गुन्हा नोंद झाला .सदर प्रकरणात पोलीस स्टेशन आष्टी यांनी प्रथमवर्ग न्याय दंडाधिकारी आष्टी याच्या समोर दोषारोप पत्र दाखल केले. सदर प्रकरणाची सुनावणी होऊन आष्टी न्यायालयाने सर्व आरोपींना दिनांक १७/७/२०१९ रोजी निर्दो ष मुक्त केले. सदर निर्णयाच्या नाराजीने मूळ फिर्यादी महादेव उमाजी लगड याने बीड येथील ड. सचिन आबूज याच्या मार्फत बीड येथील मा.सत्र न्यायालयात अपील दाखल केले. सदर अपिलात दोन्ही बाजूचा युक्तीवाद ऐकून माननीय प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश बीड यांनी फिर्यादीचे अपील अंशतः मंजूर करून आष्टी न्यायालयाचा निकाल रद्द करून आरोपी नामे महेश भाऊसाहेब लगड व रामहरी भाऊसाहेब लगड यांना सहा महिन्याचा सश्रम कारावास व एक हजार रुपये दंड आणि कलम ३२३ खाली एक महिन्याचा साधा कारावास व एक हजार रुपये दंड अशी शिक्षा दिनांक १५/२/२०२५ रोजी सुनावली. सदर प्रकरणात फिर्यादी याच्यावतीने बीड येथील ॲड. सचिन आबूज काम पहिले. त्यांना ॲड. पूजा जाधव हिने सहकार्य केले.

## श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप

### जिद्द, सातत्य, सचोटी आणि प्रामाणिकपणाला कष्टाची जोड असेल तर हमखास यश मिळते: श्री गणेशराव वाघ
### शाळेतून दिल्या जाणाऱ्या संस्कारावरच विद्यार्थ्यांचे पुढील भविष्य घडते: सौ. सुदामतीताई वाघ

**बीड । प्रतिनिधी**

जिद्द, सातत्य, सचोटी आणि प्रामाणिकपणाला कष्टाची जोड असेल तर जीवनात हमखास यश मिळते. विद्यार्थ्यांनी आपला अमूल्य असा वेळ मोबाईलमध्ये वाया न घालवता वाचनाकडे लक्ष देऊन आपलं ध्येय गाठावे, गरज पडेल तेंव्हा आम्ही सर्व तुमच्या पाठीशी आहोत तुम्ही प्रचंड अभ्यास करून जीवनात उज्ज्वल यश मिळवावे असा सल्ला शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष तथा आदर्श मुख्याध्यापक श्री गणेशराव वाघ सरांनी शिदोड येथील श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या निरोप समारंभाच्या कार्यक्रमाप्रसंगी मार्गदर्शन करताना दिला. या कार्यक्रमाच्या






अध्यक्षस्थानी संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा सौ. सुदामतीताई वाघ या होत्या. तर व्यासपीठावर गावातील ज्येष्ठ नागरिक श्री दिलीप नाना जोगदंड, सौ शालिनीताई जोगदंड, श्री मिथुन जोगदंड, नुकताच एम पीएससी परीक्षा उत्तीर्ण झालेला शाळेचा माजी विद्यार्थी चि. शैलेश जोगदंड, शाळेचे मुख्याध्यापक श्री दत्तात्रय चव्हाण सर, श्री आत्माराम वाव्हळ सर, श्रीमती फाटे मॅडम, श्रीमती सानप मॅडम आदी उपस्थित होते. बीड शहरापासून जवळ असलेल्या शिदोड येथील श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयात काल मंगळवार दि.१८ फेब्रुवारी रोजी दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभ आणि एमपीएससी परीक्षा उत्तीर्ण झालेला शाळेचा माजी विद्यार्थी चि.शैलेश जोगदंड याचा सत्कार समारंभ कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळाच्या संस्थापक अध्यक्षा सौ. सुदामतीताई वाघ ह्या होत्या. कार्यक्रमाच्या सुरुवातीला क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर आलेल्या मान्यवरांचा सत्कार स्वागत गीतासह पुष्पगुच्छ शाल आणि श्रीफळ देऊन करण्यात आला. या सत्कार समारंभानंतर इयत्ता नववी वर्गातील कु. अमृता पाखरे आणि कु. आलिशा शेख यांनी दहावीच्या विद्यार्थ्याबाबत आपले मनोगत व्यक्त करत शुभेच्छा दिल्या. तर इयत्ता दहावीच्या सर्व विद्यार्थ्यांच्या वतीने कु. प्रणाली पदमुले हिने मनोगत व्यक्त केले. तसेच प्रमुख पाहुणे श्री मिथुन जोगदंड यांनी दहावीच्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. शाळेसाठी माझी गरज लागेल तेव्हा मदतीसाठी सदैव तत्पर राहील अशी ग्वाही या वेळी शैलेश जोगदंड यांने दिली.

## छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्ताने आज बीड शहरातील प्रमुख मार्गांवर निघणार जय छत्रपती शिवाजी-जय भारत पदयात्रा

**बीड । प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्ताने उद्या बुधवार दिनांक १९ फेब्रुवारी रोजी मोठ्या प्रमाणात कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून या निमित्ताने जिल्हाभरात एकाच वेळी जय छत्रपती शिवाजी-जय भारत पदयात्रा निघणार आहे. हा उपक्रम देश पातळीवर देखील होत असून याला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी दूरदृश्य प्रणालीद्वारे संबोधित करणार आहेत.

१५ ऑगस्ट आणि २६ जानेवारी प्रमाणे राष्ट्रीय कार्यक्रम म्हणून यंदापासून छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. यानिमित्त निघणाऱ्या पदयात्रेस येथील जिल्हा क्रीडा संकुलातून प्रारंभ होईल. आरंभी भारतमाता तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांचे पूजन करून संविधानाचे वाचन करण्यात येणार आहे. यानंतर पाच किलोमीटर अंतराची ही पदयात्रा शहरातील विविध म ार्गातून जाईल. तत्पूर्वी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यानिमित्त सर्वांना संदेश देणार आहेत. सदरील पदयात्रा १९ फेब्रुवारी रोजी सकाळी ९.०० वाजता जिल्हा क्रीडा संकुल सहयोग नगर, येथून निघणार असून ती सारडा कॉम्प्लेक्स चौक, शहर पोलीस स्टेशन चौक, सुभाष रोड मार्गे, भाजी मंडई चौक, बशीर गंज चौक व छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण येथे जाणार आहे.

पदयात्रा सकाळी ९.०० वाजता सुरू होणार असून याचा समारोप छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण येथे सकाळी १०.३० वाजता होणार आहे यात अधिकाधिक युवकांनी तसेच शालेय विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

पदयात्रेबाबतचा आढावा आज एका बैठकीत शैलेश सूर्यवंशी यांनी घेतला. या बैठकीस शिक्षणाधिकारी तसेच जिल्हा क्रीडा अधिकारी व स्काऊट गाईड तसेच एनसीसी आदींचे अधिकारी उपस्थित होते.

दैनिक मराठवाडा पत्र दि. १८/०२/२०२५

**महत्त्वाच्या कागदपत्रासह चेक बुक हरवले आहे.**

संघर्ष वसंतराव वडमारे, रा. भक्ती कन्स्ट्रक्शन एकनाथ नगर, तालुका जिल्हा बीड. मी दि. ०१/०२/२०२५ रोजी सकाळी नगर रोड वरून छत्रपती शिवाजी महाराज पुतळा या ठिकाणी जात असताना माझे आय. सी. आय. सी. आय. बॅकेंचे चेक क्र ००२७०१ ते ००२७५० पर्यंतचे चेकबुक हरवले आहे., तरी कोणास सापडले असल्यास मो.क्र. ९७६२९३११११ या क्रमांकावर संपर्क साधावा. **पत्ता :** भक्ती कन्स्ट्रक्शन एकनाथ नगर, घर क्रं.डब्लू बी १ या ठिकाणी आणून द्यावे. व्योग्य बक्षीस दिले जाईल.

दैनिक मराठवाडा पत्र दि. १८/०२/२०२५

**CHANGE OF NAME**

OLD NAME : Shaikh Samiyoddin Shai. Babumiya
New Name: **Shaikh Samiyoddin Shaikh Babumiya**
Address: Hatti Khana, Kagzi Darwaza, Beed, 431122. Contact:9921526406

## जाहीर प्रगटन

**मा. विशाखा बी.पाटील ६वे सह. दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात**

**दिवाणी किरकोळ अर्ज नंबर २९४/२०२५, हरिभाऊ केशवराव आमटे विरूध्द निरंक**

अर्जदार- १.हरिभाऊ पि. केशवराव आमटे वय: ७५ वर्षे, धंदा घरकाम, रा. खांडेपारगाव ता. जि. बीड. २.अशोक पि. हरिभाऊ पि. आमटे वय: ४८ वर्षे, धंदा शेती, रा. खांडेपारगाव ता. जि. बीड, ३.सुदाम पि. हरिभाऊ पि. आमटे वय ४६ वर्षे, धंदा शेती, ता. जि. बीड. ४. मिरा भ्र. हरिभाऊ पि. आमटे वय: ३९ वर्षे, धंदा शेती घरकाम, रा. जरूड,

विरुध्द

गैरअर्जदार- निरंक

**मागणी : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत महानंदा हरिभाऊ आमटे यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी महानंदा हरिभाऊ आमटे, रा. खांडेपारगाव ता. जि. बीड. मृत्यु दि. १९/१०/२०२३ मौजे . खांडेपारगाव ता. जि. बीड. येथे मयत झालेल्या असून अर्जदार क. १ हा मयत महानंदा हरिभाऊ आमटे यांचा पती असून अर्जदार क्र. २ ते ३ हे मयताचे मुळे आहेत.

वरील अर्जदार यांना शासकीय व खाजगी कामासाठी वारस प्रमाणपत्र याची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नाही असे कोणास समजाविण्याचे असेल तर जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू आणि हया अर्जदार हयांचे हक्काबददल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना सदरहू मयत - महानंदा हरिभाऊ आमटे, रा. पाटेगांव पो.पंपळनेर ता. जि. बीड. याचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १३ माहे ०२ सन २०२५ रोजी माझ्या सहिने व न्यायालयाचे शिक्याने दिले.
सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. २४/०३/२०२५ आहे.
(मार्फत ॲड. अजय हुंबे)

आदेशावरून.
(स्वाक्षरीत) शिक्का (स्वाक्षरीत)
क.लिपीक अधीक्षक
दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

## जाहीर प्रगटन

**मा. श्री आर. जी. बागडे साहेब, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज ३०९ / २०२५, रुक्मीण विरूध्द निरंक**

अर्जदार - १. रुक्मीण भ्र. रामभाऊ सावंत, वय - ५९ वर्षे, धंदा- घरकाम, रा. ससेवाडी, ता. जि. बीड. २. लक्ष्मण पि. रामभाऊ सावंत, वय ३१ वर्षे, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे. ३. संजय पि. रामभाऊ सावंत (मयत) वारस, ३-१. अर्चना भ्र. संजय सावंत, वय ३६ वर्षे, धंदा -घरकाम, रा. ससेवाडी, ता. जि. बीड. ह.मु.संत नामदेव नगर, धानोरा रोड, बीड, ता.जि. बीड. ३- २. स्वरूप पि. संजय सावंत, वय १६ वर्षे, धंदा -शिक्षण, अज्ञान, ३-३. स्वरा पि. संजय सावंत, वय ८ वर्षे, धंदा शिक्षण, अज्ञान, अर्जदार क.३-२ व ३-३ ची अ.पा. क. आई, अर्जदार नं.३-१, रा. वरीलप्रमाणे. ४. राधा भ्र. दत्तात्रय कडवकर, वय- ३५ वर्षे, धंदा- घरकाम, रा. सावंतवाडी, ता. जि. बीड. ५. लक्ष्मी भ्र. बापु सपकाळ, वय- ४२ वर्षे, धंदा घरकाम, रा. रत्नागिरी, ता. जि. बीड. ६. कविता भ्र. सातेराम कदम, वय -३६ वर्षे, धंदा घरकाम, रा. बक्करवाडी पो.घाटसावळी ता. जि. बीड.

विरुध्द निरंक

बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट. १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत रामभाऊ पिः भानुदास सावंत मृत्यु झाला, यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी मयत **रामभाऊ पि. भानुदास सावंत** यांचा मृत्यु दिनांक ०५/०१/२०२५ रोजी झाला आहे. वरील अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

मयत रामभाऊ पि. भानुदास सावंत यांच्या मृत्युनंतर वरील अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्यांचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत रामभाऊ पि. भानुदास सावंत यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. आज दिनांक १७/०२/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्कयाने दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. २९/०३/२०२५
(मार्फत ॲड. बाळासाहेब गायकवाड)

आदेशावरून.
(स्वाक्षरीत) शिक्का (स्वाक्षरीत)
क.लिपीक अधीक्षक
दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

## जाहीर प्रगटन

**मा. श्री. ए. एम. फडतरे, ४ थे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १६८२ / २०२४**

अर्जदार- १) शकुंतला किसन रोमन, वय ६५ वर्षे, धंदा शेती, रा. कर्झणी ता.जि. बीड, २)भारत किसन रोमन, वय-४६ वर्षे, धंदा शेती, रा. मराठी शाळा जवळ, खैरे मळा, नारायणगाव पुणे, ३) रामदास किसन रोमन, वय-४१ वर्षे, धंदा-शेती, रा. कर्झणी ता.जि. बीड, ४) देवीदास किसन रोमन, वय-३६ वर्षे, धंदा शेती, रा. कर्मणी ता.जि.बीड, ५) आशाबाई शिवदास जागडे, वय-३५ वर्षे, धंदा-घरकाम, रा. वायभटवाडी ता.जि.बीड, ६) सावित्रीबाई वचिष्ट मस्के, वय-४१ वर्षे, धंदा घरकाम, रा. कारेगव्हाण ता. जि. बीड, ७) सुरेखा बाळासाहेब साबळे, वय-३७ वर्षे, धंदा घरकाम, रा. कर्झणी ता. जि. बीड. विरुध्द

गैरअर्जदार :- निरंक अर्जदार हे भारतीय आहेत

**प्रकरण :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

ज्याअर्थी अर्जदार यांनी मयत नामे किसन पि. निवृत्ती रोमन यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

मयत नामे किसन पि. निवृत्ती रोमन, रा. कर्झणी, ता. जि. बीड हे दिनांक २३/१०/२०२३ रोजी राहते घरी कर्झणी, ता. जि. बीड येथे मयत झालेले आहेत. अर्जदार कं. १ ही मयताची पत्नी असून अर्जदार क. २ ते ४ हे मयताचे मुले असून अर्जदार क्र. ५ ते ७ हया मयताच्या विवाहीत मुली आहेत. मयताचे आई वडील बऱ्याच वर्षापुर्वी मयत झालेले आहेत. अर्जदार यांच्याशिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत. अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की, शासकीय कामासाठी, कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याद्दलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक १८/०२/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.
पुढील दिनांक १८/०२/२०२५,
(मार्फत ॲड. गणेश करांडे)

आदेशावरून.
(स्वाक्षरीत) शिक्का (स्वाक्षरीत)
क.लिपीक अधीक्षक
दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

## जाहीर प्रगटन

**मा.श्री आर. जी. बागडे साहेब, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज २९३/२०२५**
**यशराज विरूध्द निरंक**

अर्जदार- यशराज पि. गोवर्धन कागदे, वय १९ वर्षे, धंदा शिक्षण, रा. मोरगाव, ता. जि. बीड.

विरुध्द निरंक

**मागणी - बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

यांचे वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत **जयश्री भ्र. गोवर्धन कागदे** मृत्यु झाला, वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी मयत जयश्री भ्र. गोवर्धन कागदे यांचा मृत्यु दिनांक १४/०१/२०२५ रोजी झाला आहे. वरील अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

मयत जयश्री भ्र. गोवर्धन कागदे यांच्या मृत्युनंतर वरील अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्यांचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत **जयश्री भ्र. गोवर्धन कागदे** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १३/०२/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले.
सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. २८/०३/२०२५ आहे.
(मार्फत ॲड. धनराज जाधव)

आदेशावरून.
(स्वाक्षरीत) शिक्का (स्वाक्षरीत)
क.लिपीक अधीक्षक
दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

# खा.सुप्रियाताईंना ठेवीदाराचे निवेदन

## जिजाऊ मल्टीस्टेट ठेव घोटाळा ED अथवा CID मार्फत चौकशी करा

### खाडे गेले,गोल्डेसाहेब आले... अद्याप मुख्य तिजोरीचा पंचनामा झाला नाही...

**बीड । प्रतिनिधी**

जिजाऊ माँसाहेब मल्टी स्टेट को.ऑ.सो.लि. बीड सुमारे २०० कोटीचा घोटाळा झाला. बीड व धाराशिव जिल्ह्यातील सुमारे ३००० ठेवीरांची लुबाडणूक झाली.

तपास अधिकारी पो.नि. खाडे यांनी लाच घेऊन अप्रत्यक्ष आरोपींना मदत केली,तपासाचे तीन तेरा वाजवले. पो.नि.खाडे गेले, गोल्डे आले अद्याप जिजाऊ मल्टीस्टेट मधील मुख्य तिजोरीचा पंचनामा झाला नाही.



अजब तपास होतो आहे. २०२३ मधील गुन्हा फॉरेन्सिक अहवाल सुद्धा आला नाही. मुख्य आरोपी बबन शिंदे यांनी अंग झटकले. पोलीस म्हणतात आरोपींचा बीपी वाढतो..जास्त चौकशी करता येत नाही.सखोल तपास झाला पाहिजे. या भुमिकेतुन ठेवीदारांचा लढा चालू आहे. घोटाळ्याचा सर्वंकष छडा लावण्यासाठी एऊ अथवा उइख उच्च स्तरीय तपास यंत्रणा मार्फत चौकशी व्हावी. या मागणीचे निवेदन खा.सुप्रिया सुळे यांना ठेवदारांनी दिले. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्रजी मस्के, खा. बजरंग बाप्पा सोनवणे,आ. संदिप भैया क्षिरसागर यांच्या मार्गदर्शना खाली मस्साजोग ता.केज येथे राष्ट्रवादी नेत्या खा. सुप्रिया सुळे यांची भेट घेऊन...जिजाऊ माँसाहेब मल्टीस्टेट ठेवीदार कृती समि तीच्या वतीने.,.. ठेव घोटाळा प्रकरणाची चौकशी एऊ अथवा सीआयडी मार्फत चौकशी करणे बाबत निवेदन देण्यात आले.

यावेळी इंजि. सखाराम कळासे, शेख कुतुब भाई, मारुती तिपाले, भाऊसाहेब परसे, प्रा.मानेसर,आर. एस. गायकवाड, अच्युतराव वाघ, सुर्यभान नवले, प्रविण पोपळे, आदी उपस्थित होते.

## मंगलनाथ मंदिरात यात्रा महोत्सव-शिवमहापुरण कथेचे आयोजन

**माजलगाव । प्रतिनिधी**

शहरातील बायपास रस्त्यावर असलेल्या मंगलनाथ मंदिरात मंगलनाथ यात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असुन दि. २० फेब्रुवारीपासुन शिवमहापुराण कथेचे आयोजन करण्यात आले आहे.



शहरातील पुरातन अशा मंगलनाथ मंदिरात मंदिराचे संस्थापक संत सितारामी महाराज यांच्या आशिर्वादाने दरवर्षी प्रमाणे याही वर्षी यात्रा महोत्सव होत असुन दि. २० ते २६ फेब्रुवारी पर्यंत शिव महापुराण कथा दु. १ ते ४ या वेळेत होणार असुन कथाप्रवक्ते श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्य श्री श्री हरिहरानंद भारती स्वामीजी हे आहेत. कथेच्या यजमान सौ. रूपालीताई सचिन शिंदे या असुन महाप्रसादाचे यजमान राजेश भाऊ मेंडके मित्र मंडळ आहे. दि. २७ फेब्रुवारीला महाप्रसाद दु. १ नंतर वाटप करण्यात येणार आहे. मंडप व साउंड सिस्टीम अंगद विश्वांभर गुंदेकर यांचे वतीने देण्यात आली आहे. या शिवमहापुराण कथा व यात्रा महोत्सवाचा लाभ घ्यावा असे आवाहन सौ.योशोदा ज्ञानेश्वर जाधव, व भक्त परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

## मराठा सेवा संघाचे मराठा भूषण पुरस्कार रमेश भाऊ पोकळे व डॉ. शरद शिंदे यांना जाहीर

**वडवणी । प्रतिनिधी**

मराठा सेवा संघ बीड व अंतर्गत सर्व कक्ष यांच्या वतीने दरवर्षी शिवजन्मोत्सव सोहळा म ोठ्या उत्साहात साजरा केला जातो या वर्षीही शिवजन्मोत्सव सोहळा दि. २१/२/२०२५ वार शुक्रवार रोजी ठीक सायं. ७ वा यशवंतराव चव्हाण नाट्यगृह बीड या ठिकाणी संपन्न होत आहे.कार्यक्रम प्रसंगी विविध क्षेत्रात कार्यरत समाजातील तळागाळातील व्यक्तीसाठी योगदान देणाऱ्या समाज रत्नांचा मराठा भूषण पुरस्कार देऊन विशेष गौरव करण्यात येणार आहे.



शिवजन्मोत्सव सोहळ्यात मराठा भूषण पुरस्काराने सामाजिक व उद्योग क्षेत्रात अतुलनीय कार्य करणारे रमेश भाऊ पोकळे तर वैद्यकीय क्षेत्रात भरीव कामगिरी करणारे प्रसिद्ध स्त्रीरोगतज्ञ डॉ. शरद शिंदे यांना मान्यवरांच्या हस्ते मराठा समाजभूषण पुरस्कार देवून गौरव करण्यात येणार आहे. यावेळी प्रसिद्ध विचारवंत ज्ञानेश महाराव यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे.या कार्यक्रमाचे उद्धघाटक बीड जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. शिवश्री अशोक थोरात साहेब तर कार्यक्रमाचे अध्यक्ष शिवश्री डॉ. ज्ञानेश मोकाटे उपमुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड हे असून प्रमुख उपस्थिती मध्ये शिवश्री एल.पी. गळगुंडे जिल्हा कोषागार अधिकारी बीड,शिवश्री चंद्रकांत शेळके तहसीलदार बीड,शिवश्री प्रवीणकुमार वानखेडे गटविकास अधिकारी बीड,शिवश्री अशोक ठाकरे विभागीय अध्यक्ष मराठा सेवा संघ यांची उपस्थिती राहणार आहे.या सर्व मान्यवरांच्या उपस्थिती मध्ये शिवश्री रमेश पोकळे,शिवश्री डॉ शरद शिंदे यांना मराठा समाजभूषण पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. तरी सर्व शिवप्रेमींनी शिवजन्मोत्सव व मराठाभूषण पुरस्कार सोहळयास उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आवाहन मराठा सेवा संघ बीड,संभाजी ब्रिगेड व अंतर्गत सर्व कक्षाच्या वतीने करण्यात येते.

## शिवजन्मोत्सवानिमित्त आयोजित शिवशाही महानाट्याचा लाभ शिवप्रेमींनी घ्यावा : आ. विजसिंह पंडित



### बाजारतळ येथे होणार अभिवादन सोहळा

**राष्ट्रवादी सार्वजनिक शिवजन्मोत्सव सोहळा समिती व नगर परिषद, गेवराई यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार दि. १९ फेब्रुवारी रोजी सकाळी १०:३० वा. गेवराई शहरातील बाजार तळ येथे छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करण्यात येणार आहे. शहरातील छत्रपती शिवाजी महाराज बाल उद्यानाचे लोकार्पण या निमित्ताने भवानी अर्बन बँकेचे अध्यक्ष बप्पासाहेब मोटे यांच्या शुभहस्ते तर आ. विजयसिंह पंडित यांच्या प्रमुख उपस्थित होणार आहे. या प्रसंगी शिवप्रेमी नागरीकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन समितीच्या वतीने करण्यात आले.**

**गेवराई । प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवन कार्यावर आधारित शिवशाही या ऐतिहासिक महानाट्याचे तीन प्रयोग शिवजन्मोत्सवानिमित्त आयोजित केले असुन शिवप्रेमी नागरीकांनी त्याचा लाभ घ्यावा असे आवाहन आ. विजयसिंह पंडित यांनी केले आहे. शिवजन्मोत्सवानिमित्त आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी सुप्रसिद्ध सिने अभिनेत्री अलका कुबल, शंतनु मोघे, महानाट्याचे दिगदर्शक महेंद्र महाडिक यांच्यासह राष्ट्रवादी सार्वजनिक शिवजन्मोत्सव सोहळा समितीचे पदाधिकारी उपस्थित होते. राष्ट्रवादी सार्वजनिक शिवजन्मोत्सव सोहळा समितीच्या वतीने बुधवार दि. १९ ते २१ फेब्रुवारी दररोज सायंकाळी ७ वा. र.भ. अट्टल महाविद्यालयाच्या मैदानावर शिवनगरी येथे शिवशाही या ऐतिहासिक महानाट्याचे विनामुल्य आयोजन करण्यात आले आहे. शुभारंभाचा पहिला प्रयोग सर्वांसाठी असुन गुरुवार दि. २० रोजीचा प्रयोग केवळ महिलांसाठी आणि शुक्रवार दि. २१ रोजीचा प्रयोग शालेय विद्यार्थ्यांसाठी आयोजित केला आहे.

## मौजे पोखरी (मैंदा) ता. जि. बीड येथे आदर्श शिक्षण संस्था बीड संचलित कला वाणिज्य व विज्ञान



**पिंपळनेर । प्रतिनिधी**

(आदर्श) महाविद्यालय पिंपळनेर येथील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सात दिवसीय विशेष युवक -युवती शिबिर संपन्न झाले. या शिबिर कालावधी मध्ये प्रा डॉ तात्याराम सोंडगे, प्राचार्य डॉ विश्वास कंधारे, मुख्याध्यापक श्री ए एस शेख, मुख्याध्यापक श्री हांडगे, प्राचार्य बाळासाहेब भांडवलकर, प्रा सतिश नेवडे, डॉ संजय कांबळे, डॉ रोहिणी जोशी, डॉ मदन काळे, प्रा वैभव शेंडगे, प्रा विनायक चोपडे यांचे मार्गदर्शन स्वयंसेवक व विद्यार्थ्यांना मिळाले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी आश्रमशाळा अधिक्षक श्री अशोक आडे, श्री बालासाहेब शिंदे, श्री अजिज सय्यद, श्री कल्याण सिरसट, श्री बाबुराव इतापे, ग्रामस्थ, शाळा महाविद्यालयाचे शिक्षक - शिक्षकेतर कर्मचारी, स्वयंसेवक व विद्यार्थ्यां यांनी खूप परिश्रम घेतले.

## शिवजयंतीनिमित्त 'नाथ चषक' बीड प्रिमीअर लिगचे आयोजन : सचिन मुळूक

### शिवसेनेच्या वतीने आयोजित क्रिकेट स्पर्धेचे आज होणार उद्‌घाटन

**बीड । प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त बीड जिल्हा शिवसेनेच्या वतीने नाथ चषक बीड प्रीमियर लीग' या भव्य क्रिकेट स्पर्धे चे आयोजन केले आहे. आज बुधवारी (दि.१९) रोजी सकाळी ९ वाजता स्पर्धे चे उदघाटन सी.पी. ग्राउंड पालवन चौक येथे होणार असून पुढील दहा दिवस या क्रिकेट स्पर्धेचा क्रिकेट प्रेमींना आनंद घेता येईल अशी माहिती शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी दिली. बीड जिल्हा शिवसेनेच्या वतीने जिल्हाप्रम ुख सचिन मुळूक यांच्या पुढाकारातून शिवजयंतीनिमित्त बीडमध्ये प्रथमच नाथ चषक बीड प्रिमीअर लिगचे आयोजन



केले आहे. १२ संघांमध्ये ही क्रिकेट स्पर्धा होणार आहे. सी.पी. ग्राउंड पालवन चौक येथे आज बुधवारी (दि.१९) रोजी सकाळी ९ वाजता स्पर्धेचे उद्धाटन जिल्हाप्रमुख अनिल जगताप, सचिन मुळूक, स्वप्नील गलधर यांच्या उपस्थितीत होणार आहे. शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांच्या वतीने विजेत्या संघाला प्रथम ५१ हजार रुपये, द्वितीय ३१ हजार रुपये, तृतीय ११ हजार रुपये आणि चतुर्थ पारितोषीक ११ हजार रुपये देण्यात येणार आहे. मॅन ऑफ द सिरिज ३१०० रुपये व स्मृतिचिन्ह, कॅच ऑफ द टुर्नामेंट २१०० रुपये स्मृतिचिन्ह, बेस्ट बॅट्समन २१०० रुपये व स्मृतिचिन्ह, बेस्ट फिल्डर २१०० रुपये पारितोषीक देण्यात येणार आहे. या शिवाय प्रत्येक हॅटट्रीक(विकेट), बेस्ट किपर, फाइनल मॅन ऑफ द मॅच, फायनल बेस्ट बॉलर, फायनल बेस्ट बॅट्समन यांना प्रत्येकी ११०० रुपये व स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित केले जाणार आहे. २८ फेब्रुवारी रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत विजेत्या संघांना पारितोषीक वितरण केले जाणार आहे. सदर स्पर्धा क्रीडा प्रेमींसाठी युट्युबच्या माध्यमातून सर्वदूर पोहोचविण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. पुढील दहा दिवस बीड शहरातील व तालुक्यातील क्रिकेट प्रेमींसाठी या स्पर्धा पर्वणी ठरणार असून जास्तीत जास्त क्रीडा प्रेमींनी स्पर्धेचा लाभ घ्यावा असे आवाहन शिवसेना जिल्हा प्रमुख सचिन मुळूक यांनी केले आहे.

## दिव्यांगांच्या जिल्हास्तरीय क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेत मानव विकास मूकबधिर विद्यालयास सर्वसाधारण विजेतेपद

### विद्यार्थ्यांचे परिश्रम, जिद्द व शिक्षकांचे यशस्वी मार्गदर्शन यामुळेच संस्थेची यशस्वी परंपरा कायम: संकेत मोदी

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील गेवराई येथे दिव्यांगांच्या जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा नुकत्याच संपन्न झाल्या. या स्पर्धेत संपूर्ण बीड जिल्ह्यातील दिव्यांग शाळा सहभागी झाल्या होत्या. या क्रीडा स्पर्धेत मूकबधिर प्रवर्गातुन अंबाजोगाई येथील श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या मानव विकास म ूकबधिर विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सर्वसाधारण विजेतेपद मिळवत आपल्या संस्थेच्या यशाचे सातत्य कायम ठेवले आहे. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार व गुण गौरव संस्थेचे कार्यकारी संचालक संकेत राजकिशोर मोदी यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी त्यांनी संस्थेतील विद्यार्थ्यांचे परिश्रम , जिद्द व त्याबरोबरच शिक्षकांचे



योग्य मार्गदर्शन यामुळेच संस्थेची यशस्वी परंपरा कायम राहिली असल्याचे मत व्यक्त केले. स्पर्धे त सहभागी झालेल्या मूकबधिर विद्यार्थ्यांमध्ये स्वप्निल सूर्यवंशी, सुरज माने,ओम ठाकरे, संस्कार कांबळे, नंदिनी अग्रवाल, अंशिका हातागळे या विद्यार्थ्यांचा समावेश होता. लांब उडी, दोनशे मीटर धावणे, गोळा फेक, ४०० मीटर धावणे अशा विविध प्रकारच्या स्पर्धाचे आयोजन दिव्यांगांच्या या जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत करण्यात आले होते. वयोगट निहाय गोळा फेक स्पर्धेत प्रथम क्रमांक ओम ठाकरे याने तर संस्कार कांबळे याने लांब उडी स्पर्धेत द्वितीय क्रम ांक पटकावला . त्याचबरोबर पूजा बळी, ओंकार सूर्यवंशी हर्षदा चाटे यांनी तृतीय क्रमांक पटकावला. या संपूर्ण स्पर्धेत मूकबधिर विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांकाची दोन ,द्वितीय दोन तर तृतीय क्रमांकाची तीन पारितोषिके पटकावत जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत सर्वसाधारण विजेतेपद मिळवले. मानव विकास मतिमंद विद्यालयातील विद्यार्थी शेख इब्राहिम निजामुद्दीन याने मतिमंद प्रवर्गात लांब उडी स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवला तर मानव विकास अपंग विद्यालयातील विद्यार्थी गंगाधर जाधव व राहुल मस्के यांनी अस्थिव्यंग प्रवर्गात १०० मीटर धावणे व २५ मीटर कुबडीवर धावणे या क्रीडा प्रकारात द्वितीय क्रमांक संपादन केला .

## आ.देशमुख यांच्या हस्ते टारपे यांना पुरस्कार



**परळी । प्रतिनिधी**

उत्कृष्ट शैक्षणिक कार्याबद्दल परळी तालुक्यातील कौडगाव हुडा येथील जिल्हा परिषद शाळेतील प्राथमिक शिक्षक रंगराव टारपे यांना पालकांच्या वतीने व माजी आमदार आर. टी. देशमुख यांच्या हस्ते १८ फेब्रुवारी रोजी आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. प्रा.संध्या कदम,शा.व्य. समितीचे अध्यक्ष बालासाहेब गव्हाणे, उपाध्यक्ष नवनाथ गिरी, पंडित गव्हाणे, ऋषिकेश कलींदर, जया कलींदर, संतोष भोसले, इंदुबाई गव्हाणे यांच्यासह विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. शैक्षणिक कार्याचा दखल घेऊन गावकऱ्यांनी गौरव केल्याबद्दल गावकऱ्यांचे आभार मानून उत्कृष्ट शैक्षणिक कार्य केल्याबद्दल टारपे सरांचे गंगाधर वानोळे यांनी अभिनंदन केले.

## महाजनवाडी येथील वार्षिक स्नेहसंमेलनात संपन्न

**लिंबगणेश । प्रतिनिधी**

मुलांच्या अंगी विविध कलागुण असतात. या कला गुणांची पारख करता आली पाहिजे. इंस्टाग्राम व फेसबुक च्या या जमाण्यात शाळेतील स्नेहसंमेलन ही आपली जागा टिकवून आहेत.आणि त्याला ग्रामीण भागात उदंड प्रतिसाद मिळत आहे.याचीच प्रचिती महाजनवाडी येथील स्नेहसंम ेलनात आली. जि.प.प्राथ.शाळा महाजन वाडी ता.बीड या ठिकाणी ओंकार स्वरुपा या गीतावर हातात दिवे घेऊन देवाची आराधना करणाऱ्या गाण्याने सुरुवात होऊन, पीचली माझी बांगडी, खंडोबाची कारभारीन,मुळीच नव्हते रे कान्हा माझ्या मना अशा श्रवणीय गाण्या बरोबरच महाराष्ट्रातील लोककलाकार वासुदेव गीत, चलावो ना नैनोसे बाण रे, दिल बहलता हैं मेरा आपके आ जाणे से या सारख्या लोकप्रिय हिंदी गीता सोबतच शिवरायांची महती



सांगणारे एकच राजा इथे जन्माला, आम्ही शिवकन्या या रोमांचित करणारी गाणी,तसेच आजच्या समाजातील जिवंत प्रश्न म्हणजे स्त्री भ्रूण हत्या वर आधारित नाटिका ने श्रोत्यांची वाहवा मिळवत,म हाराष्ट्राची लोककला असलेली लावणी चंद्रा,आता वाजले की बारा ,उगवली शुक्राची चांदणी, सांगा ना कशी दिसते मी या नऊवारी साडीवर या सारख्या ठसके बाज लावणीने श्रोत्यांना मंत्रमुग्ध करत स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. चिमुरड्यांनी सादर केलेल्या या कार्यक्रमा करिता गावातील पालकांनी ३८५८० रुपये बक्षीस म्हणून दिले.

